संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ८८३/२०१४
महाराष्ट्र सरकार –वि– सुभाष
निशाणी क्र. २०

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०५
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,
माझे नावः माधवराव
वडीलांचे नावः विश्वनाथ
आडनावः हिवाळे
माझे वयः ४४ वर्ष, व्यवसायः शेती,
राहणारः देऊळगाव ताड, ता. भोकरदन, जि. जालना.

**सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे**

मी इयत्ता दहावीपर्यंत शिकलेलो आहे. मला मराठी लिहता वाचता येते. मी सन २०१४ मध्ये आमच्या गावचा सरपंच होतो. दिनांक २४.०८.२०१४ रोजी आमच्या गावातील ज्ञानेश्वर वाघमारे यांचा अपघात झाला होता त्यामुळे मला पोलीसांनी बाणेगाव फाटा येथे बोलावले होते. त्यावेळी माझ्यासमवेत राम मिसाळ उपस्थीत होते. मी पंचनाम्यावर त्यावेळी सही केली होती. सदरचा पंचनामा अपघातासंबंधी होता.

०२. माझी केवळ सही घेतली होती. साक्षीदारास दिनांक २४.०८.२०१४ रोजीच्या पंचनाम्यावरील अनु.क्र.१ वरील सही दाखविण्यात आली. ती त्याचीच असल्याचे साक्षीदाराने सांगितले. त्यामध्ये नमुद मजकुर बरोबर आहे. सबब सदरच्या पंचनाम्यास **निशाणी क्र.२१** देण्यात येते. घटनास्थळाच्या पुर्वेस बाणेगावकडे जाणारा रस्ता, पश्चिमेस देऊळगाव ताडकडे जाणारा रस्ता व दक्षिण–उत्तर भोकरदन ते राजुर रस्ता आहे.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. ठोंबरे यांच्याकडून**

०३. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१४ मध्ये राजुर ते भोकरदन हा रस्ता खराब होता व त्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस म्हणाले म्हणुन मी पंचनाम्यावर सही केली. हे मला सांगता येणार नाही की, अपघात केव्हा झाला होता व

पंचनामा किती दिवसांनी करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यामध्ये नमुद माझ्यासमक्ष लिहण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ सही केली. उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः ०७.११.२०२५

(मयुरेश आर. काळे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन